# अमरावती शहर दैनंदीन गुन्हे अहवाल दि १०/०२/२०२४

बेकायदेशीर जमाव :–

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा अमरावती शहर अप क्र ११२/२०२४ कलम 294,143,147,148,447, 336,427 भादवि | नंदवन कॉलनी सर्कीट हाउस मागे कन्जुमर कोर्ट कॅम्प अमरावती | दि. ०९/०२/२०२४ चे २०.३० वा ते २१.०० वा<br><br>दा.ता.वेळ दि.१०/०२/२०२४ चे ००.४० वा | संजय रगुनाथ वानखडे लवय ४८ वर्ष, धंदा- वकील रा. ंदवन कॉलनी सर्कीट हाउस मागे कन्झुनर कोर्ट जवळ कॉम्प अमरावती | १)संतोष अंभोरे, २)सचिन संतोष अंभोरे, ३) एक महिला ४) एक महिला सर्व रा. राजुरा ढोपडपट्टी अमरावती, ५) गोपाल हिरामन बाजड, ६) रामदास हिरामन बाजड, ७) रोहित रामदास बाजड सर्व रा.गाडगेनगर अमरावती,८) महादेवर खडसे, ९) हिमांशु महादेव खडसे, १०) एक महिला ११) एक महिला १२) एक महिला सर्व रा. डेबंजी नगर अमरावती व इतर ५ ते ६ इसम | हकीकत अशा प्रकारे आहे की, दि. ०९/०२/२०२४ रोजी चे २०.३० वा ते २१.० वाजता रात्रीच्या वेळेला माझे घरी नमुद आरोपी व इतर ५ ते ६ अनोळखी इसम लाठ्या, काठ्या लोखंडी रॉड, व कुऱ्हाड घेवुन आले असता माझे वडिल नामे रघुनाथ वानखडे यांना बाहेर अंगणाच असल्यामुळे मारहाण केली व त्या वकिलाला बाहेर काढा आज त्याला खतम केल्या शिवाय राहत नाही घराच्या बाहेर निघाला नाही तर हॉटेल फोडुन त्याला मारुन टाकु असे म्हणु लागले त्यामुळे माझे वडिल स्वताला वाचवत कसे बसे आम्ही राहत असलेल्या टीनाचे शेड व टिनाचे भिंती असलेल्या हॉटेल मध्ये आले त्यानंतर वरिल आरोपींनी आम्ही दरवाजा बंद करुन घेतल्यामुळे लोखंडी रॉटट व दगडाच्या सहाय्याने टिनाच्या भिती व दरवाजा तोडण्याकरिता जवळपास अर्धातास ते एक तास प्रयत्न केला मी माझी बहिन, वडिल रघुनाथ वानखडे आई घराबाहेर निघत नसल्यामुळे वरिल आरोपींनी माझे भाचीचे मालकिची फोर व्हीरल गाडी व होन्डा कंपनीची टु व्हीलर गाडी लोखंडी रॉड व दगडाच्या सहाय्याने संपुर्ण फोडुन टाकली असुन प्रचंड नुसकसान झालेले आहे वरिल आरोपी हे मला व माझ्या कुटुबातील इतर वरिल नमुद नातेवाईकांना जिवने मारुण टाकण्याच्या उद्देशआने आले असल्यामुळे मी पोलीस मदतीकरिता ११२ क्रमांवर फोन केला व पोलिसांच्या गाडीत बसुन आम्ही सर्वजन पोलिस स्टेशनला आलो व सदरची फिर्याद आरोपी विरुध्द कार्यवाही करणे बाबत देत आहे अशा फिर्यादीच्या जबाणि रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

वाहनचोरी :—

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बडनेरा अप क्र.६७/२४ कलम ३७९ भादवी | झुलेलाल अपार्टमेन्ट, पवन नगर नवी वस्ती बडनेरा मधील पार्कींग | गुन्हा घ. ता. वेळ - दि. ०७/०२/२०२४ चे २३/४५ वा. ते दि. ०८/०२/२०२४ चे ०८/०० वा दरम्यान दाखल ता. वेळ - दि. १०/०२/२०२४ चे १२/४२ वा. | मनिष रमेशलाल केवलानी वय ३२ वर्ष व्यवसाय व्यापार रा. झुलेलाल अपार्टमेन्ट, पवन नगर नवी वस्ती बडनेरा | अज्ञात | हकीकत अश्याप्रकारे आहे की फिर्यादी मनिष रमेशलाल केवलानी वय ३२ वर्ष व्यवसाय व्यापार रा. झुलेलाल अपार्टमेन्ट, पवन नगर नवी वस्ती बडनेरा यांनी आज रोजी पो. स्टे बडनेरा येथे जबानी रिपोर्ट दिला की त्याची मोटार सायकल मो. सा.हिरो कंपनीची HF DELUXE क्रमाक MH२७ CS ७९९६ तिचा इंजीन क्र. HA११EXL५J०२३३२ व चेचिस क्र. MBLHAW१०२L५J८२७१४ कि. अंदाजे २००००/-हि. दि. ०७/०२/२०२४ चे २३/४५ वा. ते दि. ०८/०२/२०२४ चे ०८/०० वा दरम्यान झुलेलाल अपार्टमेन्ट, पवन नगर नवी वस्ती बडनेरा मधील पार्कीग मधुन कोणीतरी अज्ञात चौरट्याने चोरुन नेली आहे. अस्या फि. चे जबानी रि वरुन पो. स्टे ला. गुन्हा दाखल |

अपघात :—

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो.स्टे कोतवाली अप क्र - ५६ /२०२४ कलम २७९,३३७,३३८ ,४२७ | मेट्रो वाईन समोर जयस्तभं चौक अमराव | घटना ता. वेळ - दि.०९/०२ /२०२४ रोजी सांयका | तनय अनिल शिवनकर वय २० वर्ष धंदा- मजुरी रा.लहरी बाबा मंदिरा | फोरव्हिलर गाडी क्रं.MH-२७-BQ-००७२ इनोव्हा गाडी चा चालक | हकीकत आशाप्रकारे आहे की, जबानी रिपोर्ट पो.स्टे.सिटी कोतवाली अम.दि.१०/०२/२०२४ तनय अनिल शिवनकर वय २० वर्ष धंदा- मजुरी रा.लहरी बाबा मंदिरा जवळ लक्ष्मी नगर अमरावती मि समक्ष पो.स्टे ला येवुन जबानी रिपोर्ट देतो कि वर नमुद पत्यावर राहतो व मजुरी चे काम करतो.दि.०९/०२/२०२४ रोजी सांयकाळी ०९/०० वाजता लक्ष्मी नगर येथुन मि व माझा मित्र नामे गोपाल वसंतराव गाडेकर असे आम्ही दोघे अँक्टिवा गाडी क्रं.MH-२७-DK-५६६० या गाडी ने गांधी चौक येथे जाणे करीता खत्री कंम्पाउन्ट मार्गे निघालो काँटन |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | भा.द. वि.१३४ मो.वा. का | ती | ळी २१/३०वा दरम्यान<br><br>दाखल ता. वेळ - दि. ०९/०२/२० २४ चे वा. | जवळ लक्ष्मी नगर अमरावती | | मार्केट रोड ने गांधी चौक कडे जात असतांना अंदाजे ०९/३० वा दरम्याण मेट्रो वाईन शाँप समोर मागुन एक फोरव्हिलर गाडी क्रं.MH-२७-BQ-००७२ इनोव्हा फोरव्हीलर गाडी भरधाव वेगाने आली व तिने माझे गाडीला मागुन जोराने धडक दिली त्यामुळे आम्ही दोघेही गाडीसह खाली पडलो त्यामुळे मला डाव्या पायाला टोगळयाला,पाठीला,खांद्याला मार लागला तसेच माझा मित्र गोपाल गाडेकर याला सुध्दा दोन्ही हाताला व पायाला, छातीला,पाठीला मार लागला तसेच सदर फोरव्हिलर गाडी चालक याने आमचे समोर असलेला आँटो क्रं.MH-२७-AF-३२७२ या आँटो ला सुध्दा धडक दिली व तो आँटो पलटी झाला त्यामुळे आँटो चालकाला सुध्दा डाव्या डोळयाला,कमरेला,पायाला,पाठीला मार लागला व आँटो चे नुकसान झाले.तसेच MH-२७-CD-७२५८ अँक्टीव्हा गाडी ला सुध्दा धडक दिली त्यामुळे तिचे नुकसान झाले.तसेच MH-३१-BG-८८११ प्लेझर या गाडीला सुध्दा धडक दिली त्यामुळे तिचे नुकसान झाले.तसेच MH-२७-BA-४८८८ अँक्टीव्हा गाडी या गाडी ला सुध्दा धडक दिली त्यामुळे त्याचे नुकसान झाले.तसेच MH-२७-DE-१६९९ एस क्राँस फोरव्हिलर गाडी या गाडी ला सुध्दा मागुन धडक दिली त्यामुळे तिचे सुध्दा नुकसान झाले.मला व माझा मित्र गोपाल गाडेकर तसेच आँटो चालक विनोद प्रभाकर खडसे असे आम्हाला फोर व्हिलर गाडी क्रं.MH-२७-BQ-००७२ इनोव्हा फोरव्हीलर गाडी चालकाने त्याची गाडी भरधाव वेगाने व निष्काळजी पणे चालवुन आम्हाला जबर धडक दिली त्यामुळे आम्ही जख्मी झालो व आमचे सर्वाच्या गाड्याचे नुकसान झाले तसेच माझे जवळ आईसक्रिम च्या वसुलीचे ७० ते ८० हजार रुपये गाडी च्या डक्की मध्ये ठेवले होते माझी गाडी सदर फोरव्हिलर गाडी चालकाने त्याचे गाडी मध्ये फरकडत नेल्याने माझे गाडी च्या डिक्कीतुन पैशै पडले आहे ते मला डिक्की मध्ये दिसुन आले नाही सदर फोरव्हीलर गाडी चालकाने माझी अँक्टिव्ही गाडी फरकडत |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | नेल्याने त्या मध्ये ठेवलेले पैशै कुठेतरी हरवीले आहे.म्हणुन मी MH-२७-BQ-००७२ इनोव्हा फोरव्हीलर गाडी चालकाविरुध्द कायदेशीर कार्यवाही करीता रिपोर्ट देत आहे. माझा जबानी रिपोर्ट माझे सांगणे प्रमाणे मराठीत टंकलिखित केला असुन तो मला वाचुन दाखवीला तो बरोबर आहे..अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

अकस्मात मृत्यु :—

| अ. क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|
| १. | बडनेरा मर्ग न.०९ /०२०२४ कलम १७४ जा फौ | जिल्हा सामान्य रुग्णलय अम. घटना.ता.वेळ दि.०९.०२.२० २४ चे २२/२५ वा. पुर्वी दाखल ता.वेळ दि.१०.०२.२० २४ चे ०३/५० वा. | अर्जुन श्रावण वेदोर वय ५४ वर्ष रा. समता चौक बडनेरा. | नामदेव अर्जुन वेदोर वय २८ वर्ष रा. समता चौक बडनेरा. | हकीकत अश्या प्रकारे आहे की फिर्यादी ह् नमुद पत्तावर राहत असुन दि. ०९/०२/२०२४ रोजी ते त्याचे कुटुबासह घरात बसले असता माझे वडिल अर्जुन श्रावण वेदोर बाहेरन आले म्हणुन फि. ने जेवण वाढुन देवु का म्हणुन विचारले वरुन सांयकाळी ०७/०० वा. फि. चे वडील जेवायला बसले असता त्याना अस्वस्थ वाटले व ते खुर्चिवरुन खाली पडले व त्याच्या तोंडातुन रक्त आले म्हणुन त्याना डॉ. राठी नवी वस्ती बडनेरा दवाखाण्यात नेले असता त्यानी आम्हाला सरकारी दवाखाण्यात नेण्यास सांगितले वरुन आम्ही त्याना इर्विन दवाखाना येथे घेवुन गेलो.तर इर्विन दवाखाण्यातील डॉ. यांनी तपासले असता फि. चे वडिलाना मृत घोषीत केले म्हणुन पो . स्टे ला रिपोर्ट देण्यास आलो माझ्या वडिलाच्या मरणाबाबत चौकशी व्हावी हाच जबानी रि. आहे. माझे सांगणे प्रमाणे लिहला बरोबर आहे.दिलेल्या जबानी रिपोर्टवरून सदरचा मर्ग दाखल |